MHAH230007972016

**विशेष दिवाणी दावा क्र.३५/२०१६ मधील नि. ४० वरील आदेश.**

(रुपाली विलास दिवटे वि.एस.दत्ता मिनरल वॉटर प्रा.लि. व इतर)

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांच्या अर्जात कथन केले आहे की, सदर दावा वादीने प्रतिवादींविरुध्द दावा कलम १ मधील जमीनीचे खरेदीखत रद्द करून मिळणेसाठी प्रतिवादी क्र. १ व २ विरुध्द दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांना सदर दाव्याचे समन्स बजावणी झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ हजर झाला नाही. त्यामुळे त्याचेविरुध्द एकतर्फा आदेश पारीत झाला आहे. प्रतिवादी क्र. २ दाव्यात हजर झाला. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी मुदतीत कैफियत देणे गरजेचे होते परंतु वादी व तिचे पतीने प्रतिवादी कुटुंबावर प्रथमपासूनच दहशत निर्माण करून त्यांना दावा कलम १ मधुन बेकायदा बाहेर काढले, वेळोवेळी बेकायदा जमाव दावा कलम १ मध्ये आणला. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ व २ हे भितीपोटी पुढे आले नाही. प्रतिवादी यांनी जाणिवपुर्वक विलंब केलेला नाही. कैफीयत अभिलेखावर न आल्यास प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. तरी कैफीयत देण्यास परवानगी मिळावी असे त्यांचे कथन आहे.

३. वादीने निशाणी-४२ येथे म्हणणे दाखल करून अर्जास हरकत दर्शविली. त्यांच्या कथनानुसार, अर्ज खरा, बरोबर व कायदेशीर नाही. प्रतिवादींना सर्व बाबींची जाणीव असून त्याने आजपावेतो कोणतेही म्हणणे कोर्टात दिलेले नाही. जाणीवपुर्वक विलंब केला

आहे. अर्जाच्या पुष्ठयर्थ कोणताही अर्ज दाखल करण्यात आला नाही. अर्ज मोघम स्वरूपाचा आहे. सबब अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

**४.** अभिलेखाचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र.२ ला निशाणी–३० नुसार समन्स बजावणी झाली. प्रतिवादी क्र.२ ने प्रतिवादी क्र. १ चे समन्स घेण्यास नाकारले. परंतु प्रतिवादी क्र. १ व २ एकाच घरात राहत असल्याने नमुद समन्स बजावणी झाली असे ग्राहय धरून प्रतिवादी क्र. १ व २ विरुध्द प्रकरण एकतर्फा चालविण्याचा आदेश दि.०९/०१/२०२५ रोजी करण्यात आला. समन्स बजावणीपासून कमीत कमी ३० व जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत देणे आवश्यक होते. परंतु त्यांनी विहित मुदतीत कैफीयत दिलेली नाही. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुत अर्ज दि. ०१/०३/२०२५ रोजी कैफियतीसह दाखल केला. प्रस्तुत दावा खरेदीखत बेकायदेशीर ठरवुन मिळण्याकरीता दाखल केला असल्यामुळे प्रतिवादी यांना कैफीयत देण्यास संधी न दिल्यास मुळ वादमुद्दा गुणदोषावर निर्णित न होता नवीन प्रकरण दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याउलट कैफीयत अभिलेखावर आल्यास उभय पक्षकारांचा पुरावा होवून वादातील मुदयांचे एकाचवेळी गुणदोषावर निरसन होईल. त्यामुळे कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायाचे दृष्टीने संयुक्तिक ठरणार आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

अर्ज (नि.४०) वादीस रक्कम रू.१०००/– (एक हजार) कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN

Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2025.03.04 17:25:08 +0530

श्रीगोंदा.
दिनांक ०१/०३/२०२५.

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.